सी.बी.एस.ई. (C.B.S.E.), सी.आय.एस.सी.ई. (C.I.S.C.E.), आय.बी.(I.B.), आय.जी.सी.एस.ई. (I.G.C.S.E.), सी.आय.ई. (C.I.E.) इत्यादी देशातील व विदेशातील मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्द्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक: नाहप्र ४०१७/प्र.क्र.०१/२०/एस.एम.-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २२ जुलै, २०२६

संदर्भ:-१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक - नाहप्र ४०१७/प्र.क्र.०१/२०/एस.एम.-३, दिनांक ०४.०३.२०२०

प्रस्तावना :

देशातील व विदेशातील, सी.बी.एस.ई. (Central Board of Secondary Education), सी.आय.एस.सी.ई. (Council for the Indian School Certificate Examination), आय.बी. (International Baccalaureate), आय.जी.सी.एस.ई. (International General Certificate of Secondary Education), सी.आय.ई. (Cambridge International Examination) इत्यादी मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या राज्यातील शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) देण्याची कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आली होती. त्यानुसार ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापि, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षेतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये Compliance Reduction and Deregulation Exercise च्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाशी संबंधित PA-१४ (Eliminate Minimum Land Ownership Requirement for Private Schools), PA-१५ (Ease Infrastructure and Equipment Requirement for Private Schools), या बाबींमधील काही अटी/निकषात कपात/सूट देण्याचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन मा.मुख्य सचिव महोदयांनी शालेय शिक्षण विभागाशी संबंधित PA-१४ , PA-१५, या बाबींसंदर्भात दि.२२.०६.२०२६ रोजी एकत्रित बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यास अनुसरुन दि.२२.०६.२०२६ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत या विभागाशी संबंधित PA-१४, PA-१५ व OPA-२ बाबत सविस्तर चर्चा झाली. त्यामध्ये OPA- २ अंतर्गत खाजगी शाळांसाठी अत्यावश्यकता प्रमाणपत्र रद्द करावे आणि शाळा मान्यता तसेच मंडळ संलग्नतेकरीता विहीत कागदपत्रांची संख्या कमी करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

देशातील व विदेशातील, सी.बी.एस.ई. (C.B.S.E.), सी.आय.एस.सी.ई. (C.I.S.C.E.), आय.बी. (I.B.), आय.जी.सी.एस.ई. (I.G.C.S.E.), सी.आय.ई. (C.I.E.) इत्यादी मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या राज्यातील शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) देण्यासंदर्भात संदर्भाधीन नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत किंवा ना-हरकत प्रमाणापत्राचे नूतनीकरण करण्यासंदर्भात कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील "मुद्दा क्रमांक २ देशातील व विदेशातील, सी.बी.एस.ई. (C.B.S.E.), सी.आय.एस.सी.ई. (C.I.S.C.E.), आय.बी. (I.B.), आय.जी.सी.एस.ई. (I.G.C.S.E.), सी.आय.ई. (C.I.E.) इत्यादी मंडळाच्या अभ्यासक्रमाशी शाळेस संलग्नित करण्यासाठी संबंधित संस्था/ कंपनीस "**परिशिष्ट-अ**" नुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करता येईल असे नमूद आहे. त्यामध्ये "**परिशिष्ट-अ**" ऐवजी "**सुधारीत परिशिष्ट-अ**" असे वाचावे. "सुधारीत परिशिष्ट-अ" चा तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०७२२१६१६५४९०४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAMEER ANANT SAWANT

Digitally signed by SAMEER ANANT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=57b66327fd02392673b4ab4d6a85fdd38e27f3be70b7a6bd dc9bea3f08d2330b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF01D0AB2AFFB124678E1A586450069BBD9E2CBC9 28A89E57C1B37706CB9F428, cn=SAMEER ANANT SAWANT
Date: 2026.07.22 16:17:46 +05'30'

(समीर सावंत)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
६. सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद.
१४. शिक्षण निरीक्षक, दक्षिण / उत्तर/ पश्चिम विभाग, मुंबई.
१५. निवड नस्ती (एस.एम.-३/ई-१७५५०४७)

सुधारीत परिशिष्ट-अ

शासन शुद्धीपत्रक क्रमांक नाहप्र ४०१७/प्र.क्र.०१/२०/एस.एम.-३, दि. २२ जुलै, २०२६ अनुसार मान्यताप्राप्त शाळांना C.B.S.E/C.I.S.C.E./I.G.C.S.E./IB/C.I.E. व अन्य मंडळाशी संलग्नित होण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर करावयाचा प्रस्तावाचा नमुना.

अ. क्र.	तपशील	सादर करावयाची कागदपत्रे	तपशील
१	संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता/ कंपनीचे नाव व पुर्ण पत्ता		
२	शाळेचे नाव व पुर्ण पत्ता		
३	ज्या वर्गाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र हवे आहे ते वर्ग		
४	शाळा मान्यता आदेश	शाळेस परवानगीचा शासन निर्णय / शासन आदेश किंवा शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र	
५	बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील नियम ११, पोटनियम (४) अन्वये शाळेला मान्यता देण्यात आली आहे का ?	नमुना-२ मधील मान्यता प्रमाणपत्र (संपुर्ण तपशील नमूद केलेले)	
६	शाळेचा U-DISE क्रमांक	स्कुल रिपोर्ट कार्ड ची प्रत	
७	आधार प्रमाणीकरण अहवाल (१०० % प्रमाणीकरण)	UIDAI Report	
८	राज्य मंडळाशी संलग्नित असलेली शाळा अन्य मंडळाशी संलग्नित करावयाची असल्यास	अन्य मंडळाशी संलग्नित होण्यास हरकत नसल्यासंदर्भात पालक-शिक्षक संघाचा ठराव (PTA)	
९	अ) संस्थेचा सोसायटी अधिनियम १८६० (१८६० चा २१) नुसार नोंदणीचे प्रमाणपत्र किंवा ब) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (१९५० चा मुंबई २४) नुसार नोंदणी केलेला नोंदणीचे प्रमाणपत्र किंवा	संस्था नोंदणी प्रमाणपत्र	

	क) कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ८ खाली नोंदणीचे प्रमाणपत्र (लायसन्स)		
१०	संस्थेचा अद्ययावत बदल अर्ज (Latest Change Report)		
११	शाळा ज्या जमीनीवर आहे त्या जागेचा तपशील अ) जागा संस्थेच्या मालकीची आहे काय ? असल्यास, ब) जमीन / इमारत भाडे करारावर (लीज) आहे काय? असल्यास, किती वर्षांसाठी ? क) जमीन शासनाकडून मंजूर केली/ खरेदी केली असल्यास ड) जमीन शासनाकडून किंवा शासन अंगीकृत प्राधिकरणाकडून भाडेकरारावर घेतली असल्यास	जागेचे क्षेत्रफळ (चौरस मीटर किंवा हेक्टर व आर मध्ये) अ) १) जमीन संस्थेच्या मालकीची असल्यास ७/१२ चा अद्ययावत उतारा किंवा २) इमारतीसंबंधी ८ अ/ इंडेक्स २ चा उतारा अथवा मालमत्तापत्रक ब) जमीन / इमारत भाडे करारावर (लीज) असल्यास नोंदणीकृत भाडेकराराची प्रत क) मंजूरी आदेशाची किंवा खरेदीपत्राची प्रत ड) मंजूरी आदेशाची किंवा भाडेकराराची प्रत	
१२	संस्थेची / कंपनीची आर्थिक स्थिती दर्शविणारा तपशील अ) सदर खात्यावरील शिल्लक रक्कम ब) ठेव स्वरुपातील निधी	अ) अद्ययावत बँक स्टेटमेंट किंवा पासबुकची प्रत किंवा, ब) मुदत ठेव पावती.	
१३	संस्थेच्या अधिकृत लेखा परिक्षकांनी लेखा परिक्षण केल्याबाबतचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र		
१४	शासनाने विहीत केलेल्या छाननी शुल्काचा भरणा केला आहे काय ?	चलनाची पावती	
१५	शाळेमध्ये सर्व आवश्यक भौतिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत काय ? भौतिक सोयीसुविधा उपलब्धते बाबत खालील सुविधांचे (Geo Tagging) सहित फोटो	१) शाळेची पक्की इमारत (बांधकाम पूर्ण असलेली) (R.C.C. Building) २) वर्गखोल्या (Class Rooms) ३) विज्ञान प्रयोगशाळा (Science Laboratory)	

		४) ग्रंथालय (Library) ५)संगणक प्रयोगशाळा (Computer Laboratory) ६) पिण्याचे पाणी (Drinking Water) ७) मुलांचे व मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह (Toilets for Boys and Girls) ८)क्रीडांगण (Play Ground) ९) रॅम्प (Ramps) १०) अग्निसुरक्षा व्यवस्था (Fire safety Equipment)	
१६.	MRSAC संस्थेद्वारे शाळा इमारतीचे Geo-Tagging पूर्ण झाले आहे किंवा कसे? याबाबतचा अहवाल	Geo-Coordinates	

ठिकाण:- **स्वाक्षरी**

दिनांक:- **संस्था सचिव/अध्यक्ष/मुख्याध्यापक**